# FOREST DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LIMITED

(A Government of Maharashtra Enterprise)

जा.क्र: प्रशा/आस्था-४/२०२५-२६/प्र.क्र.१४७/3900     दिनांक :- 16 FEB 2026

प्रति,

१. प्रादेशिक व्यवस्थापक (सर्व)
   एफडीसीएम लि.,

२. विभागीय व्यवस्थापक (सर्व)
   एफडीसीएम लि., नागपुर

**विषय :- एफडीसीएम लि., च्या स्तरावर विधीसल्लागारांचे वैधानिक शुल्क मंजुर करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १. या कार्यालयाचे पत्र क्र. प्रशा/आस्था-४/१५४३, दि. २७/०६/२०१४
२. या कार्यालयाचे पत्र क्र. प्रशा/आस्था-४/२१९९, दि. १७/०९/२०२५

संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये एफडीसीएम लि., च्या स्तरावर न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याकरीता विधीसल्लागारांचे वैधानिक शुल्क निश्चित करण्यात आले होते. सदर वैधानिक शुल्क निश्चित केल्याचा कालावधी १० वर्षापेक्षा जास्त झाला असल्याने त्यामध्ये सुधारणा करणे या कार्यालयाच्या विचाराधीन होते.

२.० त्यानुसार संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये विधीसल्लागारांचे वैधानिक शुल्क निश्चित करण्याकरीता मुख्य महाव्यवस्थापक (नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन करण्यात आले.

३.० संचालक मंडळाने व्यवस्थापकीय संचालक यांना दिनांक १०/०५/२०२३ रोजीच्या आदेशामधील अनुक्रमांक ५४ अन्वये प्रदत्त केलेल्या अधिकारानुसार समितीने प्रस्तावित केलेल्या विविध न्यायालयाकरीता आकारण्यात येणाऱ्या वैधानिक शुल्कास खालीलप्रमाणे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | न्यायालय | रक्कम (रुपये) (प्रती न्यायालयीन प्रकरण) |
|---|---|---|
| 1 | High Court / Tribunal | 27000/- |
| 2 | Industrial Court | 18000/- |
| 3 | Labour Court | 14000/- |
| 4 | CAT / MAT | 22000/- |
| 5 | District Court / Consumer Court | 14000/- |
| 6 | Notice | 1800/- |
| 7 | Legal Opinion / Consultation | 2700/- |

५.० वरील वैधानिक शुल्का व्यतिरिक्त समितीने प्रस्तावित केल्याप्रमाणे एफडीसीएमच्या पॅनलवरील विधीसल्लागारांच्या इतर खर्चास जसे की, Clerkage, Typing/Xerox/Scan/Stamp, Vakalatnama Filing, Reply Filing खालीलप्रमाणे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | न्यायालय | रक्कम (रुपये) (प्रती न्यायालयीन प्रकरण) |
|---|---|---|
| 1 | High Court / Tribunal | 6000/- |
| 2 | CAT / MAT | 5000/- |
| 3 | Industrial Court | 5000/- |
| 4 | Labour Court | 4200/- |
| 5 | District Court / Consumer Court | 4200/- |

६.० या व्यतिरिक्त इतर विधी सल्लागारांना वरीलप्रमाणे निश्चित केलेल्या वैधानिक शुल्का पेक्षा अधिक वैधानिक शुल्क अदा करावयाचे झाल्यास त्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक कार्यालयास मंजुरीसाठी सादर करावा. त्याचप्रमाणे एफडीसीएमच्या पॅनलवर नियुक्त केलेल्या विधी सल्लागारा व्यतिरिक्त न्यायालयीन प्रकरणात दुसऱ्या विधी सल्लागाराची नियुक्ती करावयाची असल्यास त्याबाबतचा प्रस्ताव सुध्दा या कार्यालयास वेळीच मंजुरीस्तव सादर करावा.

७.० उपरोक्त प्रमाणे इतर खर्च (Other Expenditure) बाबत निश्चित करण्यात आलेल्या कमाल मर्यादेच्या अधिन राहुन आपले स्तरावर इतर खर्चाच्या मंजुरीबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी व विधी सल्लागारांना याबाबत अवगत करावे.

८.० तसेच सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणाकरीता विधी सल्लागाराची नेमणुक व त्यांच्या वैधानिक शुल्काबाबत प्रस्ताव मंजुरीस्तव या कार्यालयास सादर करावे.

९.० वरील मंजुर शुल्क हे पत्र निर्गमित झाल्याच्या दिनांकानंतर दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणास लागु राहतील.

(नरेश झुरमुरे)
व्यवस्थापकीय संचालक

प्रतिलिपी :-

१. मुख्य महाव्यवस्थापक (नियोजन), एफडीसीएम लि., यांना माहितीस्तव अग्रेषित.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, एफजीझेड यांना माहितीस्तव अग्रेषित.
३. लेखा नियंत्रक व वित्तीय सल्लागार, एफडीसीएम यांना माहितीस्तव अग्रेषित.